वाचा : १. शासन पत्रक्र.पी.टी.सी./१९७४/१०२५७६/दिनांक.२०.०२.१९७५.
२. अध्यक्ष/सचिव,सिल्लोड शिक्षण संस्था,सिल्लोड,जि.औरंगाबाद यांचा ठराव दिनांक १९.०९.२०१०.
३. अध्यक्ष/सचिव,सहारा शिक्षण प्रसारक मंडळ,सिडको,औरंगाबाद यांचा ठराव दिनांक १९.०९.२०१०.
४. मा.शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद यांचे समक्ष झालेली सुनावणी दिनांक.०९.११.२०१०.
५. मा.शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांचे आदेश जा.क्र.शिउसं/प्रावि-५/२०१०-११/३१६७५/८० दिनांक १० नोव्हेंबर २०१०.

.............................................*************.............................................

जा.क्र.जिपऔ/शिक्षण/प्रावि-३/२०१०-२०११/ 5171
कार्यालय जिल्हा परिषद,औरंगाबाद.
दिनांक १३/१२/२०१० 16

विषय : **सिल्लोड शिक्षण संस्था,सिल्लोड संचलित इंद्रगढी प्राथमिक शाळा,घाटनांद्रा,ता.सिल्लोड ही शाळा सहारा शिक्षण प्रसारक मंडळ, सिडको,औरंगाबाद या संस्थेस कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्याबाबत..**

**आदेशः-**

संदर्भिय आदेश क्रमांक ५ अन्वये **सिल्लोड शिक्षण संस्था**,सिल्लोड संचलित **इंद्रगढी प्राथमिक शाळा,घाटनांद्रा, ता.सिल्लोड** ही शाळा **सहारा शिक्षण प्रसारक मंडळ,सिडको,औरंगाबाद** या संस्थेस **२०१०-२०११** पासुन कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्यास खालील अटींच्या अधिन राहून परवानगी देण्यात येते.

१. इंद्रगढी प्राथमिक शाळा,घाटनांद्रा,ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद या प्राथमिक शाळेस शाळा संहिता आणि शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.
२. सिल्लोड शिक्षण संस्था,सिल्लोड,जि.औरंगाबाद या संस्थेने सदर शाळेतील सर्व शालेय अभिलेखे, नोंदवहया,शैक्षणिक साहित्य इत्यादी सहारा शिक्षण प्रसारक मंडळ,सिडको,औरंगाबाद या संस्थेस हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.
३. सिल्लोड शिक्षण संस्था,सिल्लोड,जि.औरंगाबाद संचलित इंद्रगढी प्राथमिक शाळा,घाटनांद्रा,ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद या शाळेतील वर्ग चालविण्यासाठी आवश्यक त्या सोयी सहारा शिक्षण प्रसारक मंडळ,सिडको,औरंगाबाद या संस्थेला उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.
४. सिल्लोड शिक्षण संस्था,सिल्लोड,जि.औरंगाबाद संचलित इंद्रगढी प्राथमिक शाळा,घाटनांद्रा,ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद या शाळेतील सर्व शिक्षक सहारा शिक्षण प्रसारक मंडळ,सिडको,औरंगाबाद या संस्थेकडे हस्तांतरीत झाली तरी त्याच शाळेत सेवेत राहतील.सदर कर्मचा-यांची वैयक्तिक मान्यता करुन घेण्याची जबाबदारी संस्थाचालकाची राहील त्याबाबत काही प्रश्न/प्रकरण उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी दोन्ही संस्थेची संयुक्तिक राहील.
५. सिल्लोड शिक्षण संस्था,सिल्लोड,जि.औरंगाबाद संचलित इंद्रगढी प्राथमिक शाळा,घाटनांद्रा,ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद या शाळेचे हस्तांतरण करण्यापूर्वीचे तक्रारी/कोर्टकेस किंवा आर्थिक व्यवहार अथवा वसूली निघाल्यास त्याची सर्व जबाबदारी दोन्ही संस्थांवर संयुक्तिक राहील.
६. मा.धर्मादाय आयुक्त यांचेकडून हस्तांतरणाबाबत नाहरकत प्रमाणपत्र तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक राहील.
७. सिल्लोड शिक्षण संस्था,सिल्लोड,जि.औरंगाबाद संचलित इंद्रगढी प्राथमिक शाळा,घाटनांद्रा,ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद या शाळेचे हस्तांतरण सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी आणि वर्गासह तसेच शैक्षणिक व भौतिक सुविधेसह करणे बंधनकारक राहील.
८. शाळेतील शिक्षकांची सन २०१०-२०११ ची वैयक्तिक मान्यता अनुशेषाप्रमाणे देण्याच्या अटीवर सदर शाळा हस्तांतरीत करण्यात येत आहे.
९. शाळेच्या हस्तांतरणाच्या संदर्भात काही तक्रारी झाल्यास,हस्तांतरणाबाबत सादर करण्यात आलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळल्यास किंवा काही न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास शाळेचे हस्तांतरणाचे आदेश रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वा/-
**शिक्षणाधिकारी(प्राथमिक)**
**जिल्हा परिषद,औरंगाबाद**

प्रतिलिपीः-
१. मा.सचिव,शालेय शिक्षण विभाग,मंत्रालय,विस्तार भवन,मुंबई-३२ यांना माहितीस्तव.
२. मा.शिक्षण संचालक (प्राथमिक) प्राथमिक शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-१ यांना माहितीस्तव.
३. मा.शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना माहितीस्तव.
४. अध्यक्ष/सचिव, सिल्लोड शिक्षण संस्था,सिल्लोड,जि.औरंगाबाद.
५. अध्यक्ष/सचिव,सहारा शिक्षण प्रसारक मंडळ,सिडको,औरंगाबाद.
६. मुख्याध्यापक, इंद्रगढी प्राथमिक शाळा,घाटनांद्रा,ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद.

**शिक्षणाधिकारी(प्राथमिक)**